दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । रविवार
१२.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २७६
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१







# बीड हत्याकांडातील सर्व आरोपींवर मकोका

## हत्येच्या प्रकरणात एसआयटीची कारवाई






बीड, (प्रतिनिधी):- बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सर्वच आरोपींवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. यामुळे या प्रकरणातील आरोपींचा पाय आणखी खोलात गेला आहे. विशेष तपास पथकाने या प्रकरणातील सर्वच आरोपींवर हत्येच्या प्रकरणात मकोका अंतर्गत कारवाई केली आहे. त्याची माहिती लवकरच कोर्टाला दिली जाणार आहे. संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या झाली होती. पोलिसांनी या प्रकरणी ७ जणांवर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. त्यापैकी ६ जणांवर आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. तर कृष्णा आंधळे नामक एक आरोपी अजूनही फरार आहे. त्याचा कसून शोध घेतला जात आहे. सीआयडीने या प्रकरणाशी निगडीत असणाऱ्या खंडणी प्रकरणात वाल्मीक कराड याला बेड्या ठोकल्या आहेत. वाल्मीक हा मंत्री धनंजय मुंडे यांचा विश्वास आहे. त्यामुळे या प्रकरणातील गांभीर्य वाढले आहे. बीडमधील सर्वपक्षीय नेत्यांनी या प्रकरणी आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत बोलताना गरज भासली तर या प्रकरणात मकोका लावण्याची घोषणा केली होती. त्यानंतर आता या प्रकरणात प्रत्यक्ष मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. एसआयटीच्या वरिष्ठ सूत्रांच्या माहितीनुसार, विष्णू चाटे, सुदर्शन घुले, जयराम चाटे, सिद्धार्थ सोनवणे, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार या ७ जणांवर मकोका लावण्यात आला आहे. धनंजय मुंडे यांचे विश्वासू वाल्मीक कराडवर सध्या आवादा पवनचक्की कंपनीकडून २ कोटींची खंडणी मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्यावर सध्या मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली नाही. पण बीडच्या सर्वपक्षीय नेत्यांनी या खंडणी प्रकरणाचा संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाशी थेट संबंध असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे भविष्यात वाल्मीक कराडवरही या कायद्यांतर्गत कारवाई केली जाण्याची शक्यता आहे. मकोका म्हणजे महाराष्ट्र कन्ट्रोल ऑफ ऑर्गनाईज्ड क्राईम ॲक्ट.... १९९९ मध्ये महाराष्ट्राच्या विधीमंडळामध्ये ▶▶पान २ वर






# वाल्मीक कराड यांनाही मकोका लावा

## हत्येमागे 'आका'च मेन-सुरेश धस



धाराशिव, (वृत्तसेवा): - बीड मधील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सात आरोपींना मकोका लावण्यात आला आहे. मात्र उरलेल्या आठव्या आरोपीला सुद्धा मकोका लावला पाहिजे. त्याच्यावर देखील ३०२ चा गुन्हा दाखल झाला पाहिजे. या हत्येमध्ये आका सुद्धा आहे. तोच मेन असल्याचा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपींना कडक शिक्षा करण्याच्या मागणीसाठी धाराशिव जिल्ह्यामध्ये सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी धस बोलत होते. ▶▶पान २ वर

# कोयता गँग मधील कुख्यात सातपुतेला शस्त्रासह पकडले



बीड, (प्रतिनिधी):-पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांसह शस्त्र बाळगून दहशत पसरविणाऱ्या विरूध्द कडक कारवाईचे आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने आज (दि. ११) पहाटे गेवराईतील म्हाडा कॉलनी परिसरात पुण्यातील कोयता गॅंगमधील कुख्यात फरार आरोपी गोरख सातपूते (बप्पा) आणि त्याचा साथीदार तात्याराव उर्फ वैभव विजय पहाडे या दोघांना मोठ्या शिताफीने गजाआड केले. यावेळी त्यांच्याकडून कोयता, तलवार, चाकू आणि गुन्ह्यात वापरलेला रिक्षा जप्त करण्यात आला. अधिक माहिती अशी कि, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी अवैध धंदे व शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची गोपनीय माहिती काढून कारवाईच्या सुचना आपल्या टीमला दिल्या आहेत. (दि.१०) रोजी रात्री उशिरा स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि सिध्देश्वर मुरकूटे हे पथकासह गेवराई उपविभागात पेट्रोलिंग करत असतांना पो.ना. विकास बाघमारे ▶▶पान २ वर

# धाराशिवमध्ये जनआक्रोश मोर्चा

## पोलीस आम्हाला कुठलीच माहिती देत नाही ; संतोष देशमुखांची लेक हत्येच्या तपासावर पहिल्यांदाच बोलली



धाराशिव, (वृत्तसेवा):-बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात महिना उलटला आहे. मात्र अद्याप हत्येचा उलगडा होऊ शकला नाही. त्यामुळे दररोज न्यायासाठी आक्रोश मोर्चा काढणाऱ्या देशमुख कुटुंबियांनी आता तपासावर संशय उपस्थित केला आहे. पोलीस आम्हाला कुठलीच माहिती देत नाही, तपास कसा सुरू आहे याची आम्हाला माहिती द्यावी अशी मागणी वैभवी देशमुख यांनी केली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्याय मिळवण्यासाठी देशमुख कुटुंबिय सध्या राज्यभर आक्रोश मोर्चे काढतंय. आज धाराशीवमध्ये या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाआधी देशमुखांची लेक वैभवी देशमुखने न्यूज १८ लोकमतशी बातचित केली आहे. यावेळी वैभवी देशमुखने हत्येचा तपासावर संशय व्यक्त केला. पोलीस आम्हाला कुठलीच माहिती देत नाही, तपास कसा सुरू आहे याची आम्हाला माहिती द्यावी अशी मागणी वैभवी देशमुख यांनी केली आहे.तसेच मुख्यमंत्र्यांनी ज्या पद्धतीने आश्वासन दिले त्या पद्धतीने तपासून आम्हाला माहिती द्यायला हवी. पण आमच्यापासून काहीतरी लपवत जात आहे, असा संशय वैभवी देशमुखने व्यक्त केला आहे. तसेच राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने गुन्हा दाखल केला असला तर ▶▶पान २ वर

### वाल्मिक कराडाचा आणखी एक प्रताप

# अनुदानाच्या नावाखाली १४० शेतकऱ्यांना कोट्यवधींचा गंडा?



बीड, (प्रतिनिधी):-बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात संशयित आरोपी वाल्मिक कराड याचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. वाल्मिक कराडने राज्यातील १४० शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. कृषीमंत्री माझ्या जवळचे आहे, तुम्हाला अनुदान मिळवून देतो, असे सांगत वाल्मीक कराड याने १४० शेतकऱ्यांकडून पैसे घेतले. ▶▶पान २ वर

# सुरेश धस यांनी बीडला बदनाम केलं

## संतोष देशमुख हत्येप्रकरणात मंत्री पंकजा मुंडे थेट बोलल्या



बीड, (प्रतिनिधी):-मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्यातील राजकारण, समाजकारण ढवळून निघाले आहे. सुरुवातीला मारेकर्यांना मोकळे रान करून देणार्या यंत्रणांना जनरेट्यापुढे अखेर कारवाई करावी लागली. या निर्घृण हत्येच्या एका महिन्यानंतर सात आरोपींना मोकका लावण्यात आला आहे. या हत्येनंतर मुंडे विरुद्ध इतर नेते असे बीडमध्ये चित्र रंगले आहे. राष्ट्रवादी, शिवसेना, भाजपा अशा पक्षांच्या नेत्यांनी धनंजय आणि पंकजा मुंडे यांच्याविरोधात मोर्चा उघडला आहे. तर पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांच्यावर जिल्ह्याची बदनामी केल्याचा पलटवार केला आहे. मंत्री पंकजा मुंडे यांनी यासर्व प्रकारावर प्रतिक्रिया दिली ▶▶पान २ वर

## बीड शहरातील रखडलेल्या रस्ते

# धुर, धुळीने बीडकरांचा श्वास गुदमरला



बीड, (प्रतिनिधी):- बीड शहरातुन जाणारे दोन राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडलेल्या अवस्थेत असुन संथगतीने होणा-या कामांमुळे धुर आणि धुळीमुळे बीडकरांचा श्वास गुदमरला असुन स्थानिक लोकप्रतिनिधींनींकडुन होणारे दुर्लक्ष यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांनी थेट केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी यांनाच साकडे घातले असुन सोमवारी दि.१३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ नितिन गडकरी यांच्या प्रतिमेची महाआरती करून बीड शहरातील रखडलेल्या अवस्थेत असणारे अर्धवट काम केलेले बीड ते अहिल्यानगर आणि धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावेत . बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ रस्त्याचे काम बीड शहर ते नवगणराजुरी दरम्यान ठेकेदार व बांधकाम विभागाच्या नियोजनाअभावी वर्षभरापासून रखडलेले असुन त्यामुळे नागरिकांना, वाहनचालकांना धुळ, खड्डे, कचखडी यांचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच बीड शहरातील १८ कोटी रुपये किंमतीचे राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल सिमेंट रस्ता काम अडीच वर्षांपूर्वी होऊनही साइडपंखे भरलेले नाहीत.दुभाजकांचे काम पूर्ण केले नाही त्यामुळे शहरातील रस्त्यांवरुन जाताना येताना वाहने घसरुन ▶▶पान २ वर




दैनिक मराठवाडा पत्र



# धर्म? नव्हे अर्थ!

तालिबान ही एक जगातील कुख्यात धार्मिक अतिरेकी संघटना. मुल्ला ओमर हा एकाक्ष दहशतवादी, गुलबुद्दीन हिकमत्यार, रशीद दोस्तम असे एकापेक्षा एक- गुंड जगातील शब्द वापरावयाचा तर-'नामचीन' दहशतवादी या संघटनेशी संबंधित होते वा त्यांनी या संघटनेचे नियमन केले होते. गुलबुद्दीन हिकमत्यार हा त्याचे राजकीय विरोधक, इस्लामी नियमांचे पालन न करणारे, महिला इत्यादींना जिवंतपणी मोटारीच्या मागे बांधून फरपटवत मारत असे तर दोस्तम हा व्यक्तीस जिवंत ठेवून त्याची त्वचा सोलून काढण्यात माहीर होता. 'तालिबान'ची सत्ता आल्यानंतर काबूल आदी शहरांतील परिसरांतील स्टेडियमवर धार्मिक बंडखोरांस दगडाने ठेचून मारण्याचा जाहीर सोहळा होत असे आणि त्यासाठी सर्वांस आमंत्रण असे. त्या देशातील बामियान येथील भव्य आणि अप्रतिम बुद्धमूर्ती पाडण्याचे पापही याच तालिबानचे. आपले 'आयसी १८४' हे विमान अपहरणानंतर दहशतवाद्यांनी काबूल येथे नेले याचे कारण या दहशतवाद्यांना 'तालिबान'चे अभय आणि आधार होता म्हणून. सत्ता हाती आल्यावर स्थापन झालेल्या ३३ सदस्यीय तालिबानी 'मंत्रिमंडळातील' १८ जण हे अधिकृतपणे दहशतवादी म्हणून घोषित केले गेलेले होते/आहेत आणि त्यातील एकास जिवंत अथवा मृत पकडून देणाऱ्यास कोट्यवधी डॉलर्सचे इनाम आजही आहे. त्या सरकारचा खुद्द म्होरक्या मौलाना हैबतउल्लाह अखुंडझादा यास संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेने आंतरराष्ट्रीय दहशतवादी जाहीर केलेले आहे. चित्रपट बंदी, स्त्रीशिक्षण बंदी, महिलांस बुरखा आदी धोरणांनी इतिहासाचे चाक उलट फिरविणारीही तालिबानच. अशा या तालिबान संघटनेकडे अफगाणिस्तानची सत्ता अधिकृतपणे आली आणि तीस दहशतवादी संघटना ठरवून बंदी घाला असे म्हणणाऱ्या सर्वांचीच पंचाईत झाली. एकेकाळी बिल क्लिंटन प्रशासनातील मेडेलिन ऑलब्राईट यांच्यासारख्या खमक्या मंत्री 'तालिबान'च्या नायनाटासाठी जातीने प्रयत्न करत. त्या डेमॉक्रॅटिक पक्षाच्या. तथापि त्याच तालिबानशी 'एन्रॉन'च्या व्यावसायिक हितासाठी रिपब्लिकन पक्षाच्या जॉर्श बुश यांनी करार केला आणि तालिबानच्या अतिरेक्यांस टेक्सास राज्यातील आपल्या शेतघरी पाहुणचारही करवला. जबरदस्तीने, सक्तीने सत्ता काबीज करणाऱ्या कोणत्याही अफगाण सरकारला भारत पाठिंबा देणार नाही, असे सणसणीत विधान इतरांच्या सुरात सूर मिसळत भारताने १३ ऑगस्ट २०२१ या दिवशी केले आणि दुसऱ्या दिवशी तालिबानच्या हाती अफगाणिस्तानची सत्ता आली. हा सारा इतिहासाचा काळा कोळसा आता नव्याने उगाळण्याचे कारण म्हणजे भारत सरकारने अधिकृतपणे पहिल्यांदा केलेली औपचारिक चर्चा. हे पुरोगामी पाऊल उचलल्याबद्दल नरेंद्र मोदी सरकारचे अभिनंदन. ही चर्चा दुबई येथे झाली आणि आपले परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी भारतीय तुकडीचे नेतृत्व केले तर तालिबानी बाजू त्यांचे 'परराष्ट्रमंत्री' आमिर खान मुत्ताकी यांनी सांभाळली. ही पहिली औपचारिक चर्चा होती या विधानाचा अर्थ इतके दिवस भारतीय प्रशासन तालिबानशी चर्चाच करीत नव्हते असा नाही. आपले कनिष्ठ अधिकारी वगैरे मंडळी तालिबानी नेतृत्वाशी याआधीही संवाद साधून होती. तथापि परराष्ट्र सचिवाच्या पातळीवर इतक्या औपचारिक चर्चेचे स्वरूप या बोलण्यांस इतके दिवस नव्हते. ते आता आले. म्हणून या चर्चेचे महत्त्व. आपले पराराष्ट्र सचिव हे उच्चशिक्षित तर तालिबानी परराष्ट्रमंत्री धर्मशिक्षित. या बैठकीत "व्यापारउदीम, प्रादेशिक घडामोडी" आदी मुद्द्यांवर चर्चा झाली, असे आपल्या परराष्ट्र खात्याचे पत्रक सांगते. या बैठकीत आपल्या परराष्ट्र सचिवांनी भारत-अफगाणिस्तान मैत्री पर्वाचा ऐतिहासिक आढावा घेतला आणि आपण त्या देशात किती विकास प्रकल्पांस साह्य केले त्याचाही उल्लेख केला. अफगाणिस्तानच्या दैन्यावस्थेमुळे त्या देशातील निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी आर्थिक गरज मोठी आहे. तिचा काही भार आपण पेलत आहोत. गेल्या काही वर्षांत भारताने ३०० कोटी डॉलर्सहून अधिक निधी



या देशात गुंतवला असून त्यातून ४०० हून अधिक प्रकल्पांची उभारणी तेथे सुरू आहे. रस्ते, धरणे यापासून ते त्या देशाच्या प्रतिनिधीगृहापर्यंत आपण निधी दिलेला आहे. या सगळ्याबद्दल या चर्चेत अफगाण मंत्र्यांनी भारताचे आभार मानले, असे आपल्या परराष्ट्र मंत्रालयाचे पत्रक नमूद करते. आगामी काळात क्रिकेटसह सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांवर अफगाणिस्तानास शक्य ती मदत करण्याचे आश्वासनही आपण दिले. ते योग्यच. लवकरच ५० हजार टन गहू, ३०० टन औषधे, शेतीसाठी आवश्यक ४० हजार लिटर्स कीटकनाशक रसायने, करोना-प्रतिबंधक लशी, गरम कपडे इत्यादी मदत भारताकडून अफगाणिस्तानला रवाना होईल. हे सर्व ठीक. पण या अफगाणिस्तानच्या तालिबान्यांची दाढी आपण कुरवाळण्याचे कारण काय, असा प्रश्न काहींस पडेल. त्याचे उत्तर हिंदू-मुसलमान संघर्षाच्या चष्म्यातून मिळणार नाही. कारण हे उत्तर शुद्ध आर्थिक आहे. मध्य आशिया आणि परिसरातील व्यापारासाठी भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे ते चाबहार बंदर. ते इराणात आहे आणि त्याच्या उभारणीत भारताने प्रचंड गुंतवणूक केलेली आहे. भारत आणि इराण संबंधांत हे बंदर हा कळीचा मुद्दा आहे. आपल्यासाठी ते महत्त्वाचे आहे कारण त्यात इराणचा विकास हे कारण नाही. तर या बंदराचा वापर करता आला तर पाकिस्तानला पर्याय मिळतो हे कारण आहे. अन्यथा प्रदीर्घ व्यापार प्रवासासाठी पाकिस्तानच्या ग्वादर बंदराचा टेकू आपणास घ्यावा लागतो आणि भारत आणि पाकिस्तानचे संबंध लक्षात घेता त्या देशावर अवलंबून राहणे धोक्याचे ठरते. यातील कळीचा मुद्दा म्हणजे या पाकिस्तानी बंदरात गुंतवणूक आहे ती चीनची. म्हणजे आधीच ते पाकिस्तानात आणि त्यात चीनचे नियंत्रण हे दुहेरी संकट. ते टाळता यावे यासाठी आपणास पर्यायी बंदर हवे होते. तो प्रश्न इराणने सोडवला. तथापि इराणवर सध्या आंतरराष्ट्रीय निर्बंध आहेत आणि त्यामुळे कोणाही देशास इराणशी व्यापारी करार-मदार करण्यास मज्जाव आहे. तसे केले तर त्या देशासही अमेरिकी निर्बंधांचा सामना करावा लागतो. पण आपण या निर्बंधांस वळसा घालू शकलो कारण अफगाणिस्तान. त्या देशात आर्थिक, सामाजिक, जीवरक्षक मदत पोहोचविण्यासाठी हे चाबहार बंदर सोयीचे आहे. तेथून मदत सामग्री खुश्कीच्या मार्गाने थेट अफगाणिस्तानात पोहोचवता येते. तेव्हा आमच्यावर निर्बंध घातले तर अफगाणिस्तानातील जनतेस आवश्यक माणुसकीची मदत करता येणार नाही, असा आपला बहाणा असल्याने या बंदीतून आपण सुटलो. आपल्यासाठी हे चाबहार बंदर आणखी एका कारणाने महत्त्वाचे. ते म्हणजे आपली ऊर्जासुरक्षा. एनर्जी सिक्युरिटी. इराण तसेच पूर्वाश्रमीच्या सोविएत साम्राज्याचा एकेकाळी भाग असलेल्या देशांत उदंड नैसर्गिक साधनसंपत्ती आणि ऊर्जास्रोत आहेत. हे खनिज तेल वा नैसर्गिक वायू भारतापर्यंत आणावयाचे असेल तर इराणचे चाबहार बंदर अत्यंत सोयीचे. त्या बंदरातून आपल्या पश्चिम किनारपट्टीवर-म्हणजे मुंबई वा अन्य-थेट वाहतूक करता येते. ही सोय झाल्याने चीन आणि पाकिस्तान यांनी मिळून आपली व्यापारी अडचण करावयाची ठरवली तरी आपल्यासमोर इराणच्या चाबहार बंदराचा पर्याय राहतो. त्यामुळे या आपल्या पहिल्या सचिव पातळीवरील अधिकृत चर्चेचे महत्त्व. या चर्चेत मानवी अधिकारांचा भंग, अफगाणिस्तानातील महिलांची गळचेपी, त्यांच्या हालअपेष्टा आदी बाबींवर आपण एक चकार शब्दही काढला नाही. तसे केले असते तर अफगाणी इस्लामी अतिरेकी रागावले असते. याचा अर्थ सरळ आहे. इस्लामी इराण असो वा अतिरेकी इस्लामवादी अफगाणिस्तान संबंधात महत्त्वाचा असतो तो अर्थ, धर्म नव्हे.

# लाडक्या बहिणींनो, १५०० की २१००?

मुंबई, (वृत्तसेवा):- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत आतापर्यंत महिलांच्या खात्यात १५०० रूपयांचे सहा हप्ते जमा झाले आहे.आता हेच हप्ते नवीन वर्षात देखील महिलांच्या खात्यात जमा होणार आहे. पण निवडणूकी दरम्यान सरकारने महिलांना १५०० रूपयांत वाढ करून २१०० रूपये देण्याची घोषणा केली होती. मात्र अद्याप महिलांना २१०० रूपयांचा हप्ता आलेला नाही आहे. त्यामुळे नवीन वर्षात तरी महिलांच्या खात्यात आता २१०० रूपये जमा होणार की १५०० रूपयेच येणार? असा सवाल महिला उपस्थित करत आहेत. खरं तर निवडणुकीनंतर सरकारने लाडक्या बहिणींना डिसेंबरचा हप्ता दिला आहे. या हप्त्यात महिलांच्या खात्यात फक्त १५०० रूपयेच जमा झाले आहेत.पण सरकारने निवडणुकीनंतर २१०० रूपये खात्यात जमा करण्याची घोषणा केली होती. मात्र सरकारने अद्याप याबाबत कोणताही निर्णय घेतल्याची माहिती राजकीय सुत्रांकडून मिळतेय. त्यामुळे महिलांच्या




खात्यातही नवीन वर्षात १५०० रूपयेच जमा होण्याची शक्यता आहे. महिलांना त्यांच्या नवीन हप्त्याची प्रतिक्षा लागली आहे. पण तो किती तारखेला महिलांच्या खात्यात जमा होणार आहे, याची अद्याप तरी माहिती मिळू शकलेली नाही.पण राज्य सरकार लाडक्या बहिणींना गोड बातमी देण्याच्या तयारीत आहे.गोड यासाठी कारण सरकार सातव्या हप्त्यासाठी मकरसंक्रातीचा मुहूर्त साधण्याची शक्यता आहे. सरकार महिलांना मकरसंक्रातीच्या मुहूर्तावर पैसे पाठवणार असल्याची माहिती सुत्रांकडून मिळतेय. त्यामुळे या मुहूर्तावर जर खरंच सरकारच्या खात्यात पैसे आले तर लाडक्या बहिणींची संक्रात आणखीण गोड होणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या अर्जाची छाननी सरकारने सूरू केली आहे.त्यानुसार ज्या महिला निकषात बसणार नाहीत त्या महिलांना त्यांचे पैसे सरकारला परत करावे लागणार आहे. त्यामुळे हे निकष काय आहेत? हे जाणून घेऊयात. *अर्ज बाद होण्याचे निकष काय? : * कुटुंबाचे अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न * घरात कोणाच्याही नावावर चारचाकी वाहन * शासकीय नोकरी अलकाना घेतलेला योजनांचा लाभ * एका सरकारी योजनेचा लाभ घेणारे असतील तर त्यांना लाभ मिळणार नाही * ज्या महिला महाराष्ट्रातून लग्न करुन दुसऱ्या राज्यात किंवा देशाबाहेर गेल्या त्यांना लाभ मिळणार नाही *ज्यांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही अर्ज भरले त्यांचे अर्ज बाद केले जाणार

# जयंत पाटील यांना हटविण्याच्या हालचाली, जवळच्या मित्राची तटकरेंनी कड घेतली, आव्हाडांनाही सुनावलं!

मुंबई, (वृत्तसेवा):- : मागील आठवड्यात शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कार्यकर्त्यांची आणि पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत पक्ष संघटनेत बदल करावेत अशी मागणी गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. यामध्ये जयंत पाटलांच्या प्रदेशाध्यक्षपदावर देखील नवीन आणि युवा चेहरा यावा, अशी मागणी होताना दिसतीये. तर आगामी काळात पक्ष संघटनेत बदल केले जातील, असे संकेत देखील शरद पवारांनी दिले आहेत. अशातच पक्ष संघटनेत बदलाचे वारे वाहू लागताच जयंत पाटील यांच्या मदतीला सुनील तटकरे धावून गेले आहेत. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे सात खासदार फोडण्याचे प्रयत्न अजित पवार गटाकडून केला जात असल्याचा दावा केला जात होता. अजित पवारांसोबत येण्याची ऑफर सुनील तटकरेंनी दिल्याची माहिती वाऱ्यासारखी पसरली होती. त्यावर सुनील तटकरेंनी आरोप फेटाळून लावले. हे आरोप निराधार आहेत मी कोणालाही संपर्क केलेला नाही. आम्हा सर्वांची संसदेत भेट झाली.



पण ती सगळ्यांचीच होते. पण मी कोणालाही राष्ट्रवादीत या असं सांगितलं नाही, असं सुनील तटकरे म्हणाले. सुनील तटकरेंना यावेळी शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षपदावर विचारलं गेलं तेव्हा त्यांनी जिगरी मित्राची कड घेतली. त्यांच्या पक्षात कोणावर काय आरोप झाले, याबाबत मी बोलणार नाही पण असं असतं की विजयाचे शिल्पकार अनेक लोक असतात पण पराभवाचे खापर कुणाच्या तरी माथ्यावर फोडलं जातं, असं म्हणत सुनील तटकरे यांनी मित्राची बाजू राखण्याचा प्रयत्न केला आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्यात एकत्र येण्याची चर्चा सुरु असती तर सुनील तटकरे यांना ते माहिती असते. परंतु, ते आमच्या खासदारांना सांगत आहेत की, बापाला आणि मुलीला राहू दे, बाजूला तुम्ही या, असं तटकरेंनी सांगितल्याचा आरोप आव्हाडांनी केला होता. त्यावर देखील तटकरेंनी उत्तर दिलंय. ही माझी भाषा नाही. मी बाप लेक असे शब्द सार्वजनिक जीवनात वापरत नाही. ज्यांनी हे सांगितले त्यांची तशी भाषा आहे. त्यामुळे माझ्याकडून असे काहीच बोलले गेलेले नाही, असं स्पष्टीकरण तटकरेंनी दिलं आहे. दरम्यान, महाविकास आघाडी हे भिन्न विचाराचे लोक सत्तेसाठी एकत्र आलेले होते. लोकसभेत त्याना यश आलं. त्यामुळे त्यांना विधानसभेला पण यशाची अपेक्षा होती. पण तसं झालं नाही. त्यामुळे ते आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका वेगवेगळे लढतील, असंही सुनील तटकरेंनी यावेळी म्हटलं आहे.

## पान १ वरून

### बीड हत्याकांडातील...

हा कायदा करण्यात आला. संघटित गुन्हेगारीला आळा घालणे हा कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. गुन्हेगारांच्या एखाद्या टोळीविरोधात किंवा टोळीच्या म्होरक्या विरोधात एकापेक्षा अधिक आरोपपत्र किंवा गुन्हे दाखल असतील तर अशा केसमध्ये मकोका लावता येतो. यावेळी या टोळ्यांनी आपल्या गुन्ह्यांमधून आर्थिक लाभ घेतला आहे का? हे देखील तपासले जाते. मकोका लावण्यासाठी गुन्हा हा रेअरेस्ट ऑफ दे रेअरेस्ट म्हणजे दुर्मिळातील दुर्मिळ गुन्हा असावा लागतो. एखाद्या टोळीवर मकोका लावयचा असेल तर तो लावण्याचा अधिकार कुणाला आहे? हे समजावून घेणेही या प्रकरणी अत्यंत महत्त्वाचे आहे. देखील महत्वाचं आहे. गुन्हा ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत गडतो, त्या ठाण्याचा अंमलदार संबंधित आरोपींवर टोळीवर मकोका लावण्याचा प्रस्ताव पाठवतो. शहरी भागामध्ये अतिरिक्त पोलिस आयुक्तांकडे हा प्रस्ताव पाठवला जातो, तर ग्रामीण भागामध्ये स्पेशल आयजी दर्जाच्या अधिकाऱ्याकडे हा प्रस्ताव पाठवला जातो. या अधिकाऱ्यांनी परवानगी दिल्यानंतर मकोका त्या - त्या प्रकरणांत लावला जातो. एखाद्या टोळीवर मकोका लावण्यात आला तर त्याचा तपास शहरी भागात एसपी दर्जाचा अधिकारी तर ग्रामीण भागामध्ये डीवायएसपी दर्जाचा अधिकारी करतो. १८० दिवसापर्यंत पोलिसांना यामध्ये आरोपपत्र दाखल करता येते. मकोका लागल्यानंतर ६ महिन्यांपर्यंत आरोपींना जामीन मिळत नाही. विशेषतः गुन्ह्याचा तपास होत नाही तोपर्यंत जामीन दिला जात नाही. पुढे देखील आरोपींना जामीन मिळणे कठीण असते. मकोका गुन्ह्यात किमान ५ वर्षांची शिक्षा व ५ लाखांचा दंड होऊ शकतो. जास्तीत जास्त शिक्षा ही गुन्ह्याच्या स्वरुपावरुन ठरत असते. या प्रकरणी आरोपींना जन्मठेप किंवा फाशीही होऊ शकते.

### बीड शहरातील रखडलेल्या...

अपघात होत आहेत. तसेच बीड जिल्ह्यातील खामगाव ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील माजलगाव ते केज दरम्यान तसेच अहमदपूर ते अहिल्यानगर मार्गावरील अंबेजोगाई ते मांजरसुंभा दरम्यान आणि पैठण ते पंढरपूर महामार्गावरील पाटोदा आणि शिरूर कासार याठिकाणी रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे व अर्धवट रखडलेल्या अवस्थेत असुन तातडीने पूर्ण करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस, सुदाम तांदळे,रामनाथ खोड, शिवशर्मा शेलार,यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत लेखी निवेदनाद्वारे केली आहे. * दिडवर्षापासून रखडलेल्या बीड ते अहिल्यानगर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे : बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ मार्गावरील शिरापुर फाटा ते बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि बार्शी नाका ते जरूड फाटा असा १६० कोटी रूपयांचे अंदाजपत्रक असलेल्या २४.५ किलोमीटरचा ९४ फुट रूंद असलेल्या रस्त्याचे काम ३० जुन २०२३ रोजी सुरू करण्यात आले. बीड शहरातील नगर रोडवर महत्वाची सर्वच शासकीय कार्यालये आहेत.यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा न्यायालय, सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृह, तहसिल पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग,यासह महाविद्यालय,हास्पिटल असुन शहराच्या दृष्टीने महत्वाचा रोड आहे.गेल्या दिड वर्षात केवळ दिड किलोमीटरचे काम करण्यात आलेले आहे. रस्त्याचे काम अत्यंतसंथ गतीने सुरू असुन रेंगाळलेल्या कामामुळे रस्त्याने जाणाऱ्यांना प्रचंड धुळीचा सामना करावा लागत असुन नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तातडीने काम पूर्ण करण्यात यावे. * राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल सिमेंट रस्त्याचे काम अर्धवट, दुभाजके अपुर्ण,साईडपंखे भरलेले नाहीत : बीड शहरातील १८ कोटी रुपये किंमतीच्या राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल सिमेंट रस्ताकाम अडीच वर्षांपूर्वी पुर्ण झाले आहे.मात्र रस्त्यावरील साईडपंखे भरलेले नाहीत.तसेच दुभाजकांचे कामही पूर्ण केलेले नाही.त्यामुळे शहरातील रस्त्यांवरुन सिमेंट रस्त्यावर जाताना व येताना वाहने घसरुन अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अडीच वर्षांपूर्वी भारतीय राज्य महामार्ग प्राधिकरण एनएचएआय वतीने शहरातील राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल दरम्यानचा १.२५ किलोमीटर रस्त्याचे काम करण्यात आले. त्यानंतर तो रस्ता देखभालीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे.मात्र बांधकाम विभागाने डागडुजी केली नाही.साईडपंखे रस्ता तयार करणारांनी भरून काढणे गरजेचे असल्याचे बांधकाम विभागाचे अधिकारी सांगतात त्यामुळे काम रखडलेलेच आहे.ते पुर्ण करण्यात यावेत. * बीडकरांचे आरोग्य धोक्यात ,धुर व धुळीमुळे श्वास गुदमरला : बीड शहरातील रखडलेले रस्ते कामामुळे जागोजागी धुळीचे साम्राज्य पसरले असुन धुळीमुळे श्वसनाचे आजार जडतात. यामुळे दम लागणे, खोकला येणे, श्वासोच्छवासास त्रास होणे तसेच श्वसन मार्गाला संसर्ग होऊन ईतर आजारही उद्भवतात त्यामुळे बीडकरांचे आरोग्य धोक्यात आले आले. *बीड जिल्ह्यातील खामगाव ते पंढरपूर, अहमदपूर ते अहिल्यानगर आणि पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय व राज्यमार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे: बीड जिल्ह्यातील खामगाव ते पंढरपूर महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव तसेच अहमदपूर ते अहिल्यानगर मार्गावरील लोखंडी सावरगाव ते मांजरसुंभा आणि पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा शहर आणि शिरूर कासार घाट आदी ठिकाणी निकृष्ट दर्जाचे व रखडलेल्या अवस्थेत कामे असुन तातडीने पूर्ण करण्यात यावेत. * बीड जिल्ह्यात अपघातात बळी जाणारांची संख्या वाढली : बीड जिल्ह्यात सन २०२२ साली ७३४ अपघात झाले.यामध्ये ३९४ भीषण अपघात होते.यामध्ये जवळपास ४६२ जणांचा मृत्यू झाला.तर २७० गंभीर अपघातात ४६१ जणांना कायमचे अपंगत्व आले.तर किरकोळ अपघातात ५८ जण जखमी झाले होते तसेच सन २०२३ साली जवळपास ८०३ अपघात झाले.यामध्ये ४५० जणांचा मृत्यू झाला.यामध्ये ४०१ पुरूष तर ४९ महिलांचा समावेश होता.तर ५३३ जणांना कायमचे अपंगत्व आले आहे तर ४४ जणांना गंभीर स्वरूपाचा मार लागला होता.सन २०२४ साली १ जानेवारी ते ३१ आगस्ट २०२४ या ८ महिन्यात २७३ अपघात झाले. या ८ महिन्यात राष्ट्रीय महामार्गावर ५२ तर राज्य मार्गावर १२९ व ईतर रस्त्यावर ९२ अशा एकुण २७३ अपघातात २६३ पुरूष व ३१ महिलांचा मृत्यू झाला आहे.याच कालावधीत जिल्ह्यात २३० अपघात असे घडले की त्यात २९२ जण गंभीर रित्या जखमी यात ३२२ पुरूष व ७० महिलांचा समावेश आहे.

### कोयता गँग मधील...

यांना गुप्त माहिती मिळाली की एक इसम रिक्षामधुन अवैध शस्त्र घेऊन जात असल्याचे समजताच पोलीसांनी सापळा लावून म्हाडा कॉलनी जवळील रस्त्यावर रिक्षा अडवला. त्यावेळी पथकाला पाहुन आरोपी पळून जाण्याच्या प्रयत्नात होते. मात्र पोलीसांनी त्यांच्यावर झडप घातली. यावेळी पोलीसांनी गोरख सातपुते (वय २९ रा. काळेवाडी फाटा धेरगाव जि. पुणे) आणि तात्याराव उर्फ विजय पहाडे (वय २८ रा.राहटी फाटा अमरदिप कॉलनी पुणे) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याजवळून एक कोयता, तलवार, चाकू व गुन्हयात वापरलेला रिक्षा असा एकूण १ लाख ४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात सहाय्यक फौजदार परशुराम जगताप यांच्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींविरुध्द गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातपूते आणि पहाडे हे दोघेही () पुणे येथील कोयता गँगचे सदस्य असुन काळेवाडी (पिंपरी चिंचवड) पोलीस ठाण्यात दाखल हाफ मर्डरच्या गुन्ह्यामध्ये ते फरार आरोपी आहेत. दोन्ही आरोपीतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गेवराई पोलीसांच्या ताब्यात दिले. ही कामगिरी पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि सिध्देश्वर मुरकूटे, सहा. फौ. तुळशीराम जगताप, पो. ह. कैलास ठोंबरे, मनोज बाघ, विष्णू सानप, राहुल शिंदे, पो.ना. विकास वाघमारे व चालक सुनिल राठोड यांनी केली.

### धाराशिवमध्ये जनआक्रोश...

ती चांगलीच गोष्ट आहे पण त्याचाही तपास लवकर व्हावा अशी मागणी देशमुख कुटुंबीयांच्या सदस्यांनी केली आहे. यावेळी बोलताना संतोष देशमुख यांच्या मुलीला पुन्हा अश्रू अनावर झाले होते. दरम्यान या प्रकरणावर शिंदेंच्या शिवसेनेचे उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे.यावेळी बोलताना सामंत म्हणाले की, संतोष देशमुख यांची मुलगी म्हणते सीआयडी ने माहिती दिली नाही, यावर कुटुंबाला माहिती दिली पाहिजे असे माझं ही म्हणणं आहे,पारदर्शक तपास होतोय तर माहिती द्यायला हवी, असे सामंत यांनी सांगितले आहे.

### सुरेश धस यांनी...

आहे. माझी प्रतिक्रीया काय असणार? असे म्हणत, गृह विभागाने निर्णय घेतलाय तर त्यांनी आश्वासन दिलं आहेकी कारवाई करणार आहेत, एका तरुणाची निर्घृण हत्या झाली. ज्यांना राजकारण करायचं ते करत आहेत, असे त्या म्हणाल्या. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते जर म्हणत असतील की शोध लागत नाही तोपर्यंत कारवाई करणार नाही. त्यावर मी काऊंटर करणार नाही. शोध लागेपर्यंत कारवाई करणार नसतील तर त्यावर मी रोज काय बोलू? असे त्या म्हणाल्या. मी महिला म्हणून खासदार राहिले, केशरकाकू, प्रितम मुंडे सगळ्या महिलांनी काम केलं. ज्या जिल्ह्यातून सगळ्यात जास्त ऊस तोड कामगार जातात, त्याला बदनाम करण्यात आलं. गुन्हेगारी लोक असती तर दरोडे घातले असते. माझ्याकडे प्रत्येक जिल्ह्याचा रेकॉर्ड आहे, मुळशी पॅटर्नच्या घटना आहेत. नागपूर मध्ये महिलेला पायावर नाक घासून माफी मागायला लावलं असे त्या म्हणाल्या. धस यांच्यावर काय बोलू? मी कुठं गप्प आहे. मी एसआयटीची मागणी केली होती. पहिली मागणी मी केली. माझ्या बोलण्यामुळे राज्य हलले असते तर आत जे ते बोलताय ते पूर्वी का बोलले नाही. मागच्या २ वर्षात का बोलले नाही, असा सवाल पंकजा मुंडे यांनी सुरेश धसांना केला.

### वाल्मीक कराड यांनाही...

या प्रकरणातील वरच्या आकाने १९ ऑक्टोंबर रोजी स्वतःच्या सातपुडा या बंगल्यावर बैठक घेतली. त्यामुळे तो यामध्ये आरोपी का नाही? असा सवाल धस यांनी उपस्थित केला. संतोष देशमुख यांची हत्या केवळ दीड कोटी रुपयांसाठी केली गेली. दीड कोटी नाही तर आम्ही तीन कोटी गोळा करून तुम्हाला दिले असते. मात्र आमच्या माणसाला अशा पद्धतीने तुम्ही मारायला नको होते, असे देखील धस यांनी म्हटले आहे. संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळवण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात कोणत्याही प्रकारचा जातिवाद केला जात नसल्याचा दावा सुरेश धस यांनी केला आहे. मंत्री धनंजय मुंडे यांचे ड्रग्ज प्रकरणातील आरोपींसोबत फोटो आहेत. त्यामुळे अजित पवारांनी धनंजय मुंडेना मंत्रिपदावरुन दूर करून त्यांच्या जागी मनोज कायंदे यांना संधी द्यावी, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली. तुमच्या पक्षातील अनेक आमदार निवडून आले आहेत. त्यातील कोणालाही संधी द्या, मात्र, यांना मंत्रिमंडळातून बाजूला करा, अशी मागणी देखील धस यांनी केली. त्यांनी भर दिवसा हत्या केली पुढील काळात ते सकाळी देखील हत्या करतील, असा इशारा देखील धस यांनी दिला आहे. आज ७ जणांना मकोका लागला. एकाला बाजूला ठेवण्यात आले आहे. त्याच्यावरही मकोका लावण्यात आला पाहिजे. आका सध्या आपला या प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याचा दावा करत असेल, पण तोच मुख्य आहे. वरच्या आकानेही १९ ऑक्टोबरला आपल्या सरकारी सातपुडा बंगल्यावर बैठक घेतली होती. ही बैठक घेणारा मंत्री या प्रकरणात आरोपी कसा नाही? हे मला पोलिसांनी समजावून सांगावे, असे सुरेश धस म्हणाले. अॅट्रोसिटी दाखल करू नका म्हणून आकाने पोलिसांना फोन केला होता. त्यानंतर आका त्याच्या आकाशी बोलला असेल. तर आकाही या प्रकरणात आरोपी होतील. या दोघांनाही बिनभाड्याच्या खोलीत टाकले पाहिजे. यांना जिल्ह्याच्या गरम बराकीत जाऊ द्या, अशी माझी पोलिसांना विनंती आहे. या लोकांनी बाहेर कितीही टारटूर केली तरी या गरम बराकीत गेले की देव आठवतात, असेही सुरेश धस म्हणाले. सुरेश धस यांनी यावेळी मारेकर्यांनी संतोष देशमुख यांना हाल हाल करून मारल्याचा आरोप केला. संतोष देशमुखला सलग ४ तास मारहाण झाली. त्यांनी पाणी मागितले तर त्यांच्या तोंडात लघुशंका करण्यात आली, असे ते म्हणाले. तुम्ही त्यांची धिंड काढली असती तरी आम्ही तुमचे अत्याचार सहन केले असते. मात्र, तुम्ही त्यांचा जीव घ्यायला नको होता. आता त्यांच्या निष्पाप मुलांनी कोणाकडे पाहायचे? असा प्रश्न धस यांनी उपस्थित केला.

### वाल्मीक कराडाचा आणखी...

या सर्वांना ११ कोटी २० लाख रुपयांचा गंडा वाल्मिक कराड याने घातल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांनी पैसे परत मागितल्यावर मारहाण करून हाकलून दिल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. वाल्मिक कराडला अटक झाल्यानंतर आता त्याचा हा प्रताप समोर आला आहे. सोलापूरसह राज्यातील १४० ऊस तोडणी यंत्र मालकांना ११ कोटी २० लाख रूपयांचा गंडा वाल्मिक कराड याने घातल्याचा आरोप पंढरपूर येथील शेतकरी दिलीप नागणे यांनी केला आहे. दिलीप नागणे हे हार्वेस्टिंग मशीनच्याद्वारे ऊस तोडणीचे काम करतात. या मशिनला प्रत्येकी ३६ लाखाचे अनुदान देतो, असे सांगून वाल्मिक कराड याने या मशीन मालकांना प्रत्येकी आठ लाख रुपये देण्याचे सांगितले होते. तत्कालीन कृषीमंत्री हे माझे जवळचे असून तुम्हाला अनुदान मिळवून देतो, तुम्ही फक्त रोख रक्कम घेऊन माझ्याकडे या, असे कराड यांनी सांगितल्याचे दिलीप नागणे यांनी सांगितले. वाल्मिक कराड याने सांगितल्यानंतर १४० मशीन मालकांनी प्रत्येकी आठ लाख रुपये गोळा करून ते एका पोत्यात भरले. हे पैसे मुंबई येथील विश्रामगृहात कराड यांना दिल्याचे दिलीप नागणे यांनी सांगितले. मात्र, नंतर कुठल्याच प्रकारचे अनुदान मिळाले नाही. त्यामुळे या मशीन मालकांनी वाल्मिक कराड यास फोन करून आम्हाला अनुदान मिळाले नाही, आमचे पैसे परत द्या, अशी मागणी केल्यावर त्यांना बीडला बोलवण्यात आले. यावेळी हे सर्व १४० मशीन मालक बीड येथे गेले असता तुमचे कोणते पैसे आहेत? असे विचारत कराड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मारहाण केल्याचे दिलीप नागणे यांनी सांगितले. या प्रकरणामध्ये सोलापूर, कोल्हापूर, अहिल्या नगर, सांगली या भागातील ऊस तोडणी यंत्र मालकांची फसवणूक केल्याचे दिलीप नागणे यांनी सांगितले. वाल्मिक कराड यांच्या दहशतीमुळे आम्ही पोलिसांत कोणतीही तक्रार दाखल केली नसल्याचेही नागणे यांनी सांगितले. आता वाल्मीक कराड याला अटक झाल्यानंतर हे १४० पैकी सोलापूर जिल्ह्यातील काही मशीन मालक तक्रार देण्यासाठी पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com



राजमाता जिजाबाई शहाजी भोसले ह्या मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई होय. त्यांना राजमाता, राष्ट्रमाता, जिजाबाई किंवा जिजाऊ म्हणून संबोधले जात असत, सिंदखेड येथील लखुजी जाधव यांची जिजाबाई होय, त्यांच्या आईचे नाव म्हाळसाबाई होते. जाधव हे देवगिरीच्या यादव घराण्याचे वंशज होते. डिसेंबर इ.स. १६०५ मध्ये जिजाबाईंचा शहाजीराजांशी दौलताबाद येथे विवाह झाला. जिजाबाई शहाजीराजे भोसले या राजमाता पूर्ण नाव जिजाबाई शहाजीराजे भोसले यांनी पदव्या राजमाता, कुलमुखत्या म्हणून घोषित केले. जिजाबाई त्यांच्या सद्गुण, शौर्य आणि दूरदृष्टीसाठी ओळखल्या जात होत्या. त्या एक कुशल घोडेस्वार देखील होत्या. त्या अत्यंत कुशलतेने तलवार चालवू शकत होत्या.

# राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त त्रिवार अभिवादन

## राजमाता जिजाबाई शहाजी भोसले १२ जानेवारी इ.स. १५९८, १७ जून, इ.स. १६७४(मृत्यू)


भारत सरकारने ७ जुलै १९९९ रोजी जिजाबाईंच्या सन्मानार्थ डाक तिकीट प्रकाशित केले. जिजाबाई या अनेक चित्रपट आणि पुस्तकांच्या प्रेरणा आहेत. राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेबांच्याच प्रेरणेने कानंद, गुंजन, वेळगंड मोसे खोऱ्यातील वीर बाजी पासलकर, झुंजारराव मारळ, तानाजी मालुसरे आदी ६०० तरुण संवगड्यांना सोबत रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. मोठ्या युक्तीने जिजाऊंच्या मार्गदर्शनामध्ये अत्यंत मुत्सद्देगिरीने बिना लढाई किल्लेदार पळून गेले, असे आदिलशाहीला कळवून पहिला किल्ला तोरणा ताब्यात घेतला. पुढे निजामशाहीचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा ह्याच्याशी स्वराज्य उभारणीबाबत चर्चा करून नरसाळा किल्ला मिळविला. चाकणचा किल्लेदार सुद्धा स्वराज्याच्याच विचाराने प्रेरित होऊन स्वराज्यात दाखल झाला. रक्ताचा थेंबही न सांडता तीन किल्ले लोकांच्या उस्फुर्त पाठींब्यातुन मिळाले. लोकांना स्वराज्य पाहिजे आहे हे स्पष्ट झाले, पुढे कोंढाण्याच्या मुसलमान किल्लेदाराला भरपूर पैसे देऊन गड ताब्यात घेतला. शहाजीराजांची परंपरागत जहाँगिरी होती पुणे, सुपे, बारामती, इंदापूर आणि शिरोळ या जहाँगिरीच्या सुरक्षिततेसाठी पुरंदर किल्ला स्वराज्यात असणे किती गरजेचे आहे, हे माँसाहेब जिजाऊंनी पटवून दिले. ऐन दिवाळीच्या दिवशीच पुरंदरचा किल्ला स्वराज्यात आला. व जिजाऊ माँसाहेबांच्या उपस्थितीत शिवरायांनी खरीखुरी दिवाळी साजरी केली. त्यामुळे शहाजीराजे शिवरायांना मदत करीत असल्याचा संशय आला जिंजीच्या मोहिमेवर गेलेल्या शहाजीराजांना वेल्लोर येथे अचानक झडप घालून आदिलशाहाने कैद करविले. आदिलशहाने दोन्ही पुत्रांचा बंदोबस्त करण्यासाठी मुर्रादखान व फतेहखान यांना पाठविले. फतेह खानाने अगदी सहज सुभानमंगळ किल्ला जिंकला म्हणून मोठ्या आनंदाने विजयोत्सव साजरा करून झोपले अश्या वेळी मल्हार कावजीच्या नेतृत्वात मावळ्यांनी अर्ध्या तासात फौज कापून काढली.उरलेले खानाचे सैन्य पळु लागले, जे जीवंत सापडले ते शरण आले, व स्वराज्यात मावळे म्हणून दाखल झाले. खानाचा खजिना, नव्या दमाचे ५०० घोडे मिळाले व हीच रसद पुढे खानाच्या पराभवासाठी वापरली. महाराजांनी खानाच्या बोलसद, शिरवळ छावणीवर हल्ले करून खानाला डिवचले. खानाने पुरंदरवर चाल केली, खानाचे सैन्य पुरंदरवर अर्ध्यापर्यंत चढल्यावर अचानक दरवाजा उघडून खानाच्या सैन्यावर हल्ला चढविला आणि खानाचे सैन्य कापून काढले. खानाचा सासवडपर्यंत पाठलाग केला, तिकडे संभाजी राजांनी सुद्धा हिंदू राजांना एकत्रित करून फर्राबखानाची धुळधाण उडविली, अश्याप्रकारे आदिलशहाला जिजाऊ माँसाहेबांच्या दोन्ही पुत्रांनी तडाखेबंद उत्तर दिले. जिजाऊंच्या सल्ल्यानुसार शिवाजी महाराजांनी मोगलांचा दक्षिणेतील सुभेदार मुराद बक्ष यांच्याशी संधान साधले व आदिलशाहीला मोगलांकडून फर्मान आले शहाजीराजे भोसले आमचा माणूस आहे, शिवाजी भोसले आमच्या सेवेत आहे, त्याचे वडील शहाजीराजे यांना तातडीने मुक्त करावे त्यामुळे शहाजीराजेंची सन्मानपूर्वक सुटका करण्यात आली, आदिलशहाला मोठी चूक झाल्याचे कळून चुकले आणि त्याने शहाजीराजेंना दरबारात बढती देऊन फर्जंद पदावर घेतले, या संपूर्ण प्रकरणामागे माँसाहेब जिजाऊंची मुत्सद्दीगिरी कारणीभूत ठरली. २५ जुलै १६२९ला निजामाने विश्वासघाताने भर दरबारात वडील राजे लखुजीराव, भाऊ अचलोजी व राघोजी आणि भाचा यशवंतराव या चौघा कुटुंबियांना एकाच वेळी खून केला. तेव्हापासून जिजाऊ माँसाहेबांनी स्वराज्य निर्मितीचा ध्यास घेऊन अखंड सावधानता बाळगली. निजामाच्या दरबाराची पुन्हा पुनरावृत्ती होऊ नये म्हणून एकाच वेळी चार ठिकाणी स्वराज्याचे चारधाम चार शक्तिस्थळे निर्माण केली. शहाजीराजेंना कर्नाटक प्रांतात छोटे छोटे हिंदू राजे एकत्र करून कर्नाटकात त्या राजांना सहकार्य करण्याची भूमिका मांडली मोठ्या मुलगा संभाजी राजांना बंगलूर या शहरात १५,००० फौजेनिशी कारभार सोपविला. सावत्र मुलगा व्यंकोजीराजे ( तुकाईचा मुलगा ) ला तंजावर येथे शहाजीराजे व संभाजीच्या आश्रयाखाली सुरक्षित वातावरणात ठेवले. इकडे मावळ्यांसह जिजाऊ व शिवाजी महाराजांनी अभेद्य राजगडाला राजधानी बनवून महाराजांना सुरक्षित केले. यामुळे जिजाऊ माँसाहेब जिवंत असेपर्यंत कधीही शहाजीराजे, संभाजीराजे, व्यंकोजीराजे, शिवाजी महाराजांवर प्राणघातक हल्ला परतवून लावण्यामध्ये मावळ्यांच्या सहकार्याने यश मिळत गेले. सर्व काही सुरळीत चालू असताना अचानक

१७ जून १६७४ रोजी किल्ले रायगडाजवळील पाचाड गावात माँ जिजाऊ साहेब त्यांचे निधन झाले. तेव्हा शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला अवघे बारा दिवस झाले होते,

माँ जिजाऊ च्या जाण्याने अख्खा हिंदुस्थान पोरखा झाला होता,

**लेखसंकलन : पत्रकार डॉ सुरेश गांधले तलवाड़ा**
**मो. ९८२२१६०६२८**

# स्वराज्यप्रेरिका विजयवर्धिनी कुलमुखत्यार: राजमाता जिजाऊ!!!




*यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत!*
*अभ्युथानंधर्मस्य तदत्मानं सृजाम्यहम !*
*परित्राणाय साधुनाम विनाशाय च दुष्कृताम्*
*धर्म संस्थापनार्थाय संभावामी युगे युगे!*

जेव्हा जेव्हा भारतामध्ये धर्माची हानी होईल , जेव्हा जेव्हा अधर्म वाढेल , तेव्हा तेव्हा मी येईल , सज्जन लोकांचे रक्षण करण्यासाठी आणि दृष्ट लोकांचा नाश करण्यासाठी . धर्माची स्थापना करण्यासाठी प्रत्येक युगात मी जन्म घेईल . या भगवद्गीतेतील ओळी सार्थ ठरतात जेव्हा स्वराज्यप्रेरिका विजयवर्धिनी राजमाता मासाहेब जिजाऊ यांचे जीवन चरित्र आपण वाचतो . वरून आसमानी संकट आणि खाली मुघल साम्राज्याचे वाढते वर्चस्व या काळामध्ये म्हाळसाबाई व लखुजी जाधव यांच्या पोटी १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा येथील सिंदखेडराजा येथे कन्यारत्न जन्माला आले . पारतंत्र्यामध्ये जन्माला आलेल्या जिजाऊ ला लहानपणापासूनच गुलामीची लाचारी , जीवनाची चीड निर्माण झाली होती . त्यामुळेच ज्या वयात मुले खेळभांडे खेळण्यात व्यस्त असायचे त्या वयात त्यांनी समशेर हातात घेऊन स्वराज्य स्थापनेची खूणगाठ मनाशी बांधली होती . अगदी लहान वयात असतानाच त्या घोडसवारी , तलवारबाजी अशा विविध युद्ध कलेमध्ये पारंगत झाल्या होत्या . डिसेंबर १६०५ मध्ये जिजाऊंचा विवाह शहाजीराजांशी दौलताबाद येथे झाला . विदर्भाची कन्या ही मराठवाड्याची सून झाली होती . मराठवाड्यात आल्यावरही आदिलशाही , निजामशाही , मुघलशाही अशा वेगवेगळ्या सुलतानांच्या पारतंत्र्यात जगत असणाऱ्या रयतेची हतबलता , शहाजीराजांना जहागिरी असूनही मिळणारे दुय्यम स्थान , शेतकऱ्यांची असणारी बिकट अवस्था , स्त्रियांची अब्रू वेशीवर टांगणारे , त्यांचा छळ करणारे सुलतान हे सगळे पाहून जिजाऊंचे मन उद्विग्न व्हायचे म्हणूनच त्यांनी स्वराज्याची स्थापना व्हावी हे एकच स्वप्न पाहिले होते व आपल्या पोटी स्वराज्य निर्माता जन्माला यावा असे साकडे त्यांनी आई भवानीला घातले . १९ फेब्रुवारी १६३० रोजी किल्ले शिवनेरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला . त्यानंतर शहाजीराजांना बेंगलोर मध्ये कर्नाटक जहागिरी सुपूर्द करण्यात आली . म्हणून त्यांनी वडिलोपार्जित पुणे जहागिरी मासाहेब जिजाऊ यांच्याकडे सोपविली . यानंतर मासाहेब आणि बाल शिवबा पुणे येथे वास्तव्य आले . मात्र तेथील अवस्था पाहून जिजाऊंचे मन हेलावून गेले . पुणे येथे दुष्काळ पडलेला होता व ते ओसाड झाले होते आणि तेव्हाच निजामशाही सरदार मुरारजगदेव यांनी पुणे जाळून टाकले होते . त्या भूमीवरून गाढवाचा नांगर फिरवून ही भूमी अपवित्र आहे असे सांगून शेतकऱ्यांना भ्रमित केली होते . या उलट मासाहेबांनी बाल शिवबाच्या हस्ते तिथे सोन्याचा नांगर चालवला . तिथे शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना बी बियाणे , औत , शेती साहित्य अनुदान देण्यास सुरुवात केली . जंगली जनावरांपासून पिकांचे संरक्षण व्हावे यासाठी तरुण मावळ्यांना सोन्याचे कडे बक्षीस देण्याची शर्थ ठेवली . यामुळे तरुण मावळ्यांना काम ही मिळू लागले व या निमित्ताने त्यांच्या मनामध्येही स्वराज्याची स्वप्ने गुंफण्यास मासाहेबांनी प्रयत्न चालू केले . तलवारीच्या धारेवर नव्हे तर कौतुकाच्या थापेवर त्यांनी मावळे जोडण्यास सुरुवात केली . आणि हेच मावळे नंतर शिवरायांसोबत अखेरच्या श्वासापर्यंत लढताना दिसले . पुणे सोडून गेलेल्या रयतेला पुन्हा पुण्यात स्थायिक होण्यासाठी प्रयत्न केले . पुण्याची पुनर्स्थापना करण्याचे तसेच आधुनिक प्रगत पुण्याचा पाया घालण्याचे श्रेय जिजाऊंना जाते . याचबरोबर शिवरायही मोठे होत होते . स्वराज्य स्थापना हेच जिजाऊ चे अंतिम लक्ष्य होते . त्यासाठी त्यांनी बाल शिवबाच्या जडणघडणीकडे व संस्काराकडे विशेष लक्ष दिले . पुस्तकी शिक्षणाबरोबरच त्यांनी शिवरायांना राजकीय शिक्षण देण्यास सुरुवात केली . वेगवेगळ्या पराक्रमी शूरवीरांच्या कथा सांगून त्यांनी शिवरायांना स्वराज्याचे महत्त्व पटवून दिले . त्यांच्या मनामध्ये स्वराज्याच्या स्वप्नांची पेरणी करण्यास सुरुवात केली . स्वराज्य स्थापनेमध्ये छत्रपतींना सर्वात मोठी मदत झाली ते जिजाऊंनी दिलेल्या भौगोलिक शिक्षणाची शिवनेरीच्या अंगाखांद्यावर खेळताना सह्याद्रीच्या कुशीत निर्भयपणे वावरायला त्यांनी शिवरायांना शिकवले आणि याच शिक्षणातून पुढे शिवरायांनी गनिमीकावा तंत्र वापरून मोठमोठ्या सुलतानी संकटांना मात दिली . शिवराय पन्हाळगडावर सिद्धी जोहरच्या वेढ्यात अडकलेले असताना या वीर मातेने स्वतः च्या हाती तलवार घेऊन वेडा फोडण्याची सिद्धता दाखवली होती . सिद्धी जोहार शिवरायांना पडलेला वेढा , स्वराज्यावरील मिर्झा जयसिंगची स्वारी , संभाजी राजे सोबत शिवाजीराजांनी केलेली आग्रा भेट अशा संकट काळात जिजाऊंची स्वराज्य चालक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका होती . या कठीण परिस्थितीत जिजाऊंनी शिवरायांच्या अनुपस्थितीत मोठ्या कौशल्याने स्वराज्याचा कारभार सांभाळला . शिवभारत ग्रंथामध्ये जिजाऊंचा , महासाध्वी विजयवर्धीनी जिजाऊ ही यादव राजांची नंदिनी पृथ्वीतलावर जागृत आहे असा उल्लेख केलेला आहे . शहाजीराजांनी आणि शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी सुलतानी सत्तांच्या विरोधात मिळवलेल्या विजयाच्या जिजाऊ या प्रेरक व द्योतक आहेत . या थोर मातेला स्वराज्याचा स्थापना पुत्र स्वराज्याचा छत्रपती , मराठा पातशाहा होताना पाहण्याचे भाग्य लाभले . मासाहेब जिजाऊंच्या आणि अखंड महाराष्ट्राच्या आशीर्वादाने शिवराय रायागडावर राज्याभिषेक करून स्वतंत्र राज्याचे छत्रपती झाले . अखेर १७ जून १६७४ किल्ले रायगड त्यांच्या स्वराज्यमध्ये शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला अवघे बारा दिवस झालेले असताना निधन झाले .

*सिंदखेडराजी । तेजस्वी तो तारा*
*जाधवांच्या घरा । जिजाबाई*
*लखुजीच्या पोटी । ते देदीप्यमान*
*रत्नची जन्मून । प्रकटले*
*अर्धांगिनी शोभे । शूर वीर बाला*
*राजा शहाजीला । कुलवंत*
*पुणे नगरीला । नावरूप आले*
*भाग्यची लाभले । रयतेला*
*अन्यायाची चीड । कोण ते वारील*
*अबलांवरील । अत्याचार*
*गुरु तू होऊन । तेज:पुंज बाळा*
*तूच आकारीला । शिवबाला*
*स्वतंत्र स्थापावे । स्वराज्य आपुले*
*स्वप्न दाखवले । मनोहारी*
*कार्य तुझे थोर । कसे फेडू ऋण*
*मऱ्हाठा म्हणून । अभिमानी*
*माता तू साऱ्यांची । कन्यकाही तूचि*
*या महाराष्ट्राची । पराक्रमी*
*शिष झुकवून । त्रिवार नमन*
*स्पर्शून चरण । मी पावन*
*अशा या थोर मातेस त्रिवार नमन !!*



**– अश्विनी डोळस – बनसोडे**
**ग्राम महसूल अधिकारी, बीड**
**मार्गदर्शन : चंद्रकांत शेळके, तहसीलदार , बीड**

# उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्ती होत नाही तोवर थांबू नका : स्वामी विवेकानंद



**प्रत्येक युवकासाठी हे ब्रीद वाक्य नसून एक प्रेरणा आहे. युवक हा देशासाठी एक भक्कम पाया म्हणून देशाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणार असतो . यावरूनच आपल्या लक्षात येते की राष्ट्रनिर्माणात युवकांचे महत्त्व स्वामी विवेकानंदांना माहीत होते . स्वामी विवेकानंदांनी ( नरेंद्र दत्त ) आपली सारी व्याख्याने युवकांना उद्देशून दिली आहेत . १२ जानेवारी १९६३ साली कोलकातामध्ये त्यांचा जन्म झाला . त्यांचे विचार ऐकून आपल्यामध्ये एक प्रकारची उर्जा संचारते .**

बहुरुपे सम्मुखे तोमार छाडि
कोथाय खूंजिछो ईश्वर
जीवे प्रेम करे जेई जन
सेई जन सेविछे ईश्वर

अर्थ : ईश्वर अनेक रूपाने तुझ्या समोर उभा आहे . ते सोडून तू कुठे ईश्वराला शोधतोस ? जे कोणी प्राणिमात्रांवर प्रेम करतात , तेच ईश्वराची ( खरी ) सेवा करतात .

तुमचा विकास आतून झाला पाहिजे . तुम्हाला कोणीही शिकवू शकत नाही . तुम्हाला कोणीही आध्यात्मिक बनवू शकत नाही . तुमच्या स्वतःच्या आत्म्याव्यतिरिक्त तुमचा दुसरा कोणीही शिक्षक नाही . म्हणजेच स्वामीजींचे तत्त्वज्ञान आणि त्यांनी ज्या आदर्शांसाठी जगले आणि कार्य केले ते भारतीय युवा दिनासाठी प्रेरणादायी ठरू शकतात , असे सरकारने म्हटले आहे .भारत सरकारने १९८४ मध्ये महान स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय युवा दिवस म्हणून जाहीर केला .

स्वामी विवेकानंद यांनी आपल्या विचारांमुळे स्वत:ची एक वेगळी ओळख बनवली . भारत तरुणांचा देश असून या तरुणांना स्वामी विवेकानंद यांचे विचार योग्य दिशा देतील . ते अतिशय कुशाग्र बुद्धिमत्तेचे होते .

स्वामी विवेकानंद यांनी स्थापन केलेली रामकृष्ण मिशन जगभरात ओळखली जाते . त्यांनी आपले संपूर्ण जीवन सामाजिक कार्यासाठी समर्पित केले . त्यांनी केलेली कामे ही युवकांसाठी प्रेरणा देणारी आहेत .

स्वामी विवेकानंदांच्या मते, मनाचे चार स्तर आहेत : १) विचार करण्याची शक्ती २) बुद्धिमत्ता किंवा इच्छाशक्ती ३) व्यर्थता आणि ४) हृदय . हृदय हा एक घटक आहे ज्यामध्ये सर्व प्रकारची उत्कटता कार्य करते . हे सर्व वृत्तीचे भांडार आहे . मनाच्या सर्वात खोल प्रदेशात आत्मा वास करतो.

गुरू व ज्ञान – स्वामी विवेकानंद एक भारतीय संन्यासी आणि तत्त्वज्ञ होते . रामकृष्ण परमहंस यांचे ते शिष्य होते . त्यांनी पाश्चात्य जगाला वेदांत आणि योगाच्या भारतीय दर्शनांचा ( शिकवण , पद्धती ) परिचय करून देण्यात प्रमुख भूमिका निभावली . अनन्यचित्त होऊन गुरूने सांगितलेल्या मार्गाने साधना करीत नरेंद्र उन्नती साधत होता . रामकृष्णांच्या पवित्र सहवासात नरेंद्रात आमूलाग्र बदल झाले . त्यांच्यासह असलेल्या अन्य तरुण साधकांनी रामकृष्णांच्या आदर्शांना स्वीकारून काशीपूरच्या उद्यानात तपश्चर्या केली . रामकृष्णांच्या सेवेत हे सर्व तरुण सतत राहिल्याने त्या सर्वांच्यात अपूर्व आध्यात्मिक प्रेमसंबंध जोपासले गेले . येथे या ठिकाणीच भावी 'रामकृष्ण संघाची' पायाभरणी झाली . गुरूचे स्थान युवकांसाठी महत्वाचे असते हे सर्व युवकांना दाखवून दिले . रामकृष्णांच्या पवित्र सहवासात नरेंद्रात आमूलाग्र बदल झाले . त्यांच्यासह असलेल्या अन्य तरुण साधकांनी रामकृष्णांच्या आदर्शांना स्वीकारून काशीपूरच्या उद्यानात तपश्चर्या केली . रामकृष्णांच्या सेवेत हे सर्व तरुण सतत राहिल्याने त्या सर्वांच्यात अपूर्व आध्यात्मिक प्रेमसंबंध जोपासले गेले . येथे या ठिकाणीच भावी 'रामकृष्ण संघाची' पायाभरणी झाली . मानव जातीचे अंतिम सत्य ज्ञान हे असून आयुष्यात भोगाव्या लागणाऱ्या एक ना एक दुःखाचे कारण सुखालाच आपल्या जीवनाचे अंतिम लक्ष्य ठरवून त्यासाठी सारखी धडपड करीत असतो . मानवजातीला घडवणारी कर्म शक्ती ही च सर्वापेक्षा अधिक प्रबळ होय. परंतु चिकाटी धरल्यास ती स्वार्थमलिनता कमी होत जाऊन अखेरीस समय येईल ज्यावेळी आपण अधून मधून निःस्वार्थ कर्म करण्यास समर्थ होऊ . धर्माचे ध्येय गाठण्याच्या पद्धतींना आम्ही 'योग' म्हणतो, आणि आम्ही जे योग शिकवतो ते वेगवेगळ्या स्वभावांना व मनोधर्मांना जुळणारे असतात – १.कर्मयोग– कर्म व कर्तव्य , २.भक्तियोग– सगुण ईश्वरावर प्रेम करून व त्याची भक्ती , ३.राजयोग– मनः संयम , ४.ज्ञानयोग – ज्ञानाचा योग . याद्वारे मनुष्य साक्षात्कार करून घेतो .

विवेकानंदांचे चरित्र : – सर्वप्रथम इ.स. १८९८ साली , विवेकानंदांच्या हयातीत प्रकाशित झाले . ते चरित्र मराठीत होते . तसेच अमृतपुत्र विवेकानंद (बालसाहित्य, दत्ता टोळ) ; मानवतेचा महापुजारी (सुनील चिंचोलकर) ; राष्ट्रद्रष्टे विवेकानंद : (वि. वि. पेंडसे, ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन) ; शोध स्वामी विवेकानंदांचा (दत्तप्रसाद दाभोळकर)

संन्याशाची सावली (विवेकानंदांच्या जीवनावरील कादंबरी, लेखक – चंद्रकांत खोत) ; स्वामी विवेकानंद (संदीप जावळे) (२०१५)

स्वामी विवेकानंद आणि २१वे शतक (श्रीपाद कोठे) ; स्वामी विवेकानंद : भारतातील गुरु–शिष्य परंपरेची मशाल (सरश्री)

**– चंद्रकांत शेळके , तहसीलदार , बीड**

# रणवीर पंडित यांनी विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण केली : प्रवीणकुमार बांगर

## शिवशारदा पब्लिक स्कूलच्या मैदानावर विद्यार्थ्यांचा क्रीडा आविष्कार

**गेवराई । प्रतिनिधी**

जीवनामध्ये शिस्त हवी असेल तर आपल्याला कुठल्यातरी खेळाची आवड असली पाहिजे आणि ती आवड निर्माण करण्याचे काम शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले आहे. क्रीडामहोत्सवाच्या माध्यमातून गेवराई तालुक्यातील क्रीडा क्षेत्रात चांगले वातावरण तयार झाले आहे असे प्रतिपादन गेवराई पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांनी केले. क्रीडा महोत्सवाच्या सातव्या दिवशी थलेटिक्स स्पर्धेचा शुभारंभ करताना ते बोलत होते.

जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवामध्ये शनिवार दिनांक ११ जानेवारी रोजी शिवशारदा पब्लिक स्कूलच्या भव्य मैदानावर १४ व १७ वयोगटातील मुलांच्या थलेटिक्स स्पर्धांचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी गेवराई पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, रामराव आघाव,



विलास सरडेजयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासनाधिकारी प्रा. गोगुले यांच्यासह मान्यवर उपस्थित होत.

यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेतील सर्व शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाला सर्व मुख्याध्यापक, क्रीडाशिक्षक विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये क्रीडा महोत्सवातील स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात येतील अशी माहिती क्रीडा महोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित यांनी यावेळी दिली.

### ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडूंचा क्रीडा आविष्कार

**क्रीडा महोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित यांच्या नेतृत्वाखाली जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेच्या मुख्याध्यापक व क्रिडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थी खेळाडूंनी आपला क्रीडा अविष्कार दाखवला. थलेटिक्स स्पर्धांमध्ये धावणे, लांब उडी, गोळा फेक, मिक्स रिले आदी प्रकारात आपल्या क्रिडा गुणांचा उपस्थितांना साक्षात्कार घडवला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थी खेळाडूंचे कौतुक करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## आधार माणुसकीचा ग्रुपच्या वतीने गरजवंतांना ब्लॅकेट वाटप

**तलवाडा । प्रतिनिधी**



बीड शहरांमध्ये कार्यरत असणारे पोलीस कर्मचारी माननीय श्री रंजीत पवार हे प्रत्येक नवीन वर्षात पदार्पण करत असताना आधार माणुसकीचा ग्रुप सातत्याने काहीतरी नवीन उपक्रम राबवत आला आहे. कडाक्याची थंडी पडली असताना आपण आपल्या कुटुंबीयासाठी उबदार कपडेब्लॅकेट घेतो अन् आपल्या कुटुंबाचे थंडीपासून बचाव करतो, आपण समाजात राहतो, आपण समाजाचे देणे लागतो, या व्यापक विचारातून आधार माणुसकीचा ग्रुप ने थंडीच्या दिवसात रस्त्याच्या कडेला थंडीत कुडकुणा-या निराधार लोकांना ऊब मिळण्यासाठी ब्लॅकेटचे वाटप करण्याचा निर्णय घेतला, अन् ग्रुप मधील सदस्यांनी पुढे येऊन सढळ हा ताने निराधारांसाठी आर्थिक योगदान देऊत हा उपक्रम यशस्वीपणे राबवत निराधार, गरजवंतांना बीड शहरात ४१ ब्लॅकेटचे वाटप केले यापूर्वीही आधार माणुसकीचा ग्रुप च्या वतीने शहागडु, गेवराई परिसरात निराधार, गरजवंतासाठी ब्लॅकेट वाटप करण्यात आले होते .

## आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याच्या आरोपातून आरोपींची निर्दोष मुक्तता : ॲड.शशिकांत सावंत

**बीड । प्रतिनिधी**



जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी दिनांक ८/०१/२०२५ रोजी सत्र केस क्रमांक ८८/ २०२३ मध्ये महत्वपूर्ण निकाल देऊन सबळ पुराव्या अभावी आरोपीचा बचाव ग्राह्य धरून सर्व आरोपींची सदर केस मधून निर्दोष मुक्तता केलेली आहे.

घटनेची हकीगत आशि की दिनांक ११ /१२ /२०२० रोजी फिर्यादी दादाराव भगवान महानोर यांनी चकलांबा पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली की त्यांच्या मुलीचा विवाह आरोपी क्रमांक एक नागेश नारायण थोरात यांच्याशी दिनांक १२/०७/ २०२० रोजी करून दिला होता व सदर लग्न झाल्यानंतर आरोपी क्रमांक एक ते सात यांनी लग्नात राहिलेल्या हुंड्याची मागणी केली व सततच्या हुंड्याच्या मागणीच्या जाचाला कंटाळून फिर्यादीच्या मुलीने दिनांक १०/१२/२०२० रोजी शेंबडे शेकटा तालुका गेवराई जिल्हा बीड येथील अशोक रावसाहेब धोंगडे यांच्या विहिरीमध्ये उडी मारून आत्महत्या केली सदर आत्महत्यास आरोपी क्रमांक १ ते ७ हे जबाबदार असून आरोपींच्या जाचाला कंटाळून फिर्यादीच्या मुलीने आत्महत्या केल्याची फिर्याद गु.र.न. ३४७/२०२० कलम ३०४(ब) ३०६, ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वय हुंडाबळी, व आत्महत्या करणेस प्रवत्त करण्याचा गुन्हा दाखल झाला होता सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने मा. न्यायालया मध्ये एकूण १७ साक्षीदारांचे जबाब नोंदवून दोषारोप पत्र दाखल करण्यात आले, त्या अनुषंगाने सरकारी पक्षाच्या वतीने एकूण आठ साक्षीदार यांचे जबाब नोंदवण्यात आले, आरोपीच्या वतीने घेण्यात आलेला बचाव व साक्षीदारांच्या जबाबा मध्ये आलेली विसंगती पाहून मा. न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली त्यांना ॲड मुकुंद लोणकर, ॲड अभिषेक बहिर, ॲड. डाके, ॲड भांडवले, ॲड. प्रदीप दराडे यांनी सहकार्य केले.

# आरोग्य सेवक बाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसनिमित्त विविध कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

युवासेना मराठवाडा निरिक्षक मा.बाजीराव दादा चव्हाण यांचा वाढदिवस अनाथ व गरजूवंतान सोबत साजरा करण्यात आला. वाढदिवस म्हटल की अतिशबाजी आणि धिंगाणा हार तुरे ही संकलपना आज समाजा मध्ये रूढ झालेली असताना. आरोग्य सेवक बाजीराव दादा चव्हाण यांनी आपल्या कार्यकर्त्यांना व मित्र परिवार यांना माझ्या वाढदिवसानिमित्त कुठल्याही प्रकारचा बडेजाव पणा न करता व मला शुभेच्छा देण्यासाठी माझ्याकडे मुंबईला न येता. आपल्या मातीतील गरजूवंत लोकांची सेवा करुण माझा वाढदिवस साजरा करा अश्या सूचना दिल्या. दादांनी दिलेल्या सूचनेवरून मित्र परिवारने छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिर आयोजित केले. मोरगाव येथील नागनाथ विद्यालय मोरगाव येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळ वाटप केले. पिंपळनेर येथील संनराईज इंग्लिश स्कूल विद्यालय येथे शालेय साहित्य वाटप. बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे अन्नदान तसेच



सहारा अनाथालय गेवराई येथील मुलांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली. यानंतर जिल्हा रुग्णालय बीड येथे दि.९जानेवारी २०२५ रोजी जन्म झालेल्या मुलींना चांदीचे चैन व मुलींच्या मातेस साडी वाटप करण्यात आले. या सर्व सामाजिक उपक्रमांनी बाजीराव दादा चव्हाण यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा आणि दिर्घआयुष्याचा शुभेच्छा मित्र परिवार व युवासेने कडून देण्यात आल्या.

## वसंतराव नाईक महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन आणि वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक महाविद्यालय ग्रंथालय विभागात १ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रम ंतर्गत ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्धाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी अभ्यासक्रमाचा, अभ्यास करता करता सुद्धा अवांतर वाचन अतिशय महत्त्वाचे आहे हे पटवून देऊन त्यामुळे विद्यार्थीदशेतच अमुलाग्र बदल



होण्यास ग्रंथ वाचन किती महत्त्वाचे आहे, हे उदाहरणासहित सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रबंध श्रीमती सीमा वडते यांनी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी प्रोत्साहित केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवून ग्रंथ प्रदर्शनास प्रतिसाद दिला. या ग्रंथ प्रदर्शनास महाविद्यालयाचे अधीक्षक श्री. शैलेश चव्हाण, समिती सदस्य आणि प्राध्यापक डॉ. कमलेश महाजन, डॉ. अमसिद्ध सन्न्के, श्री नानासाहेब पाटील, श्री. सागर मगरे हे उपस्थित होते. तसेच हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी समिती सदस्य डॉ. शिवचरण गिरी, डॉ. बालाजी जोकरे, श्री. आशिष बोधडे, श्रीमती सुवर्णा दंडे, श्री. सुनीलकुमार सोनगीरे, ग्रंथालय कर्मचारी श्रीमती गोपिका पुठेवाड, श्री. रविंद्र गवळी, श्री. विनायक पवार, श्री. सुंदर राठोड, श्री. रमाकांत राठोड आदी प्रयत्न घेत आहेत.

## मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा स्पर्धेत श्री.विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सा) प्रथम

### शाळेला मिळाले ३ लाखाचे पारितोषिक, केज तालुक्यातुन पटकावला प्रथम क्रमांक

**केज । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ मध्ये केज तालुक्यातून सारणी (सांगवी) येथिल श्री.विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला असून शाळेला ३ लाखांचे पारितोषिक मिळाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतिने घेण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ ची केज तालुकास्तरीय स्पर्धा



नूकतीच तहसिलदार,गटविकास अधिकारी,गटशिक्षण अधिकारी यांच्या नेतृत्वात पार पडली.स्पर्धेत शाळेतील भौतिक सुविधा,विद्यार्थी गुणवत्ता,शाळेतील स्वच्छता आदी बाबींना धरून शाळेची निवड करण्यात येते.तालुकास्तरीय झालेल्या स्पर्धेत सारणी (सांगवी) येथिल श्री.विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकवला आसून शाळेला ३ लाखांचे पारितोषिक मिळाले आहे. दरम्यान गटशिक्षणाधिकारी लक्ष्मणजी बेडसकर,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुनिलजी केंद्रे ,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी चाटे, केंद्रप्रमुख आयु. धम्मदीपा दरबारे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली श्री .विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सा) या शाळेने केज तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आसून शाळेने ३ लाख रुपयांचे पारितोषिक पटकावले आहे.

## विद्या मंदिर इंग्लिश स्कूल मध्ये वकृत्व स्पर्धा सपन्न



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

दिंद्रुड येथील विद्यामंदिर इंग्लिश स्कूल ला राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धेचे आयोजन शनिवारी सकाळी करण्यात आले होते.बालचिमुकल्यांनी आपल्या अबोल भाषेत स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतींना या प्रसंगी उजाळा दिला. ह.भ.प. बालासाहेब ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली या वकृत्व स्पर्धेस शाळेचे अध्यक्ष बळीराम पारेकर, पत्रकार संतोष स्वामी यांची प्रमुख उपस्थिती याप्रसंगी होती.

ज्युनिअर केजी ते इयत्ता तिसरीत शिकणार्या विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या जन्मा पासून मृत्यू पर्यंतच्या प्रवासात केलेल्या कार्याचा लेखाजोखा अबोल वाणीतून मांडला. अक्षरा तोंडे, सार्थक बडे, वेदिका कटारे, श्रावणी मुळे,शरयु जाधव सह रूही बडे,ऋतीका सोनवणे, अमृता पांढरे,गौरी मुसळे या नऊ विद्यार्थ्यांनी दोन गटात प्रथम, द्वितीय तृतीय व उत्तेजनार्थ बक्षीस यावेळी पंचांच्या निर्णयानुसार घोषित करण्यात आले.राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या पोशाख परिधान केलेल्या विद्यार्थीनींनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.सुत्रसंचालन सहशिक्षिका पल्लवी शिंदे व आभार मोहिनी कटारे यांनी मानले.

## वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या विशाल जारवाल ची शालेय राष्ट्रीय वेसबॉल स्पर्धेसाठी निवड

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

बारामती येथे झालेल्या शालेय बेस बॉल राज्यस्तरीय स्पर्धेत १९ वर्ष आतील गटात विशाल जारवाल ने उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्र संघात स्थान मिळवले असून नांदेड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेस पात्र झाला आहे. राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाला पदक मिळवून देण्याचा विशाल ने निर्धार व्यक्त केला.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजाराम राठोड, सचिव



नितीन राठोड, प्राचार्य डॉ संजय शिंदे , प्रबंधक सीमा वडते, अधीक्षक शैलेश चव्हाण, पर्यवेक्षक विवेक थोरमोटे, डॉक्टर सत्यजित पगारे, यांनी खेळाडूंना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले. खेळाडूंना मार्गदर्शन प्राध्यापक सागर मगरे यांचे लाभले.

## अवैध धंदे मोडीत काढण्यासाठी तलवाडा पोलीस निरीक्षक नरके अँक्शन मोड मध्ये

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी तलवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माननीय श्री सोमनाथ नरके यांनी कंबर कसली असून अवैध व्यावसायिकांवर आता कडक कारवाई केली जाणार असल्याची माहिती पोलिस निरीक्षक सोमनाथजी नरके शरद यांनी दिली. तालुक्यातील अवैध



दारुव्यवसाय करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाईही सुरु करण्यात आली आहे.अशा वारंवार गुन्हे करणा-या व्यावसायिकांवर झोपडपट्टी दादा कायदाअंतर्गत कारवाई होणार आहे.

**थेट माझ्याशी संपर्क साधा... अवैध दारु,मटका, जुगार,अंमली पदार्थ यांविषयक तक्रार असल्यास माझ्या वैयक्तिक मोबाईल क्रमांक ९५९४९९७२५७ या क्रमांकावर थेट संपर्क साधावा असे आवाहन तलवाडा पो. नि.नरके साहेब यांनी केले आहे.**

## दिवसा ढवळ्या शेतकऱ्याचा रस्ता अडवून जबरी चोरी ; केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

### पोलिसांनी आरोपी तात्काळ अटक करावेत अन्यथा जिल्ह्यात आंदोलन छेडणार : कुलदीप करपे

**केज । प्रतिनिधी**

मागील वर्षीचे ऊसाचे फरक बिल उचलून गावी निघालेल्या शेतकऱ्यावर पाळत ठेवून केज -धारूर मार्गावरील केज शहरापासून दोन किमी अंतरावर ट्रिपल सीट येऊन ये भैया थांब ...म्हणून अनोळखी ३ लोकांनी गाडी आडवी लावून धमकावून शेजारील शेतात गचुरी पकडून नेत मोबाईल, जवळील रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेत गालावर चापट मारुन शेतात गप बस नाहीतर आनखी मार देईल अशा धमक्या देत पसार झाले. याबाबत या घटनेतील शेतकरी श्री. अजय परमेश्वर वीर रा.सुर्डी(थोट) ता.जि. बीड यांच्या फिर्यादीवरून केज पोलिस ठाण्यात गु.र नं. ००१४ /२०२५ भारतीय न्याय संहिता BNS(२०२३)चे कलम ३०९(४) नुसार गुन्हा दाखल झाला असून. पुढील तपास पोहेकॉ बिक्कड करत आहेत. या घटनेतील आरोपींना तात्काळ जेरबंद करण्यात यावेत अन्यथा बीड जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते कुलदीप करपे यांनी दिला आहे.

याचे सविस्तर वृत्त असे की दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी सुर्डी(थोट)ता. जि. बीड येथील शेतकरी श्री अजय परमेश्वर वीर हे केज येथील गंगा माऊली शुगर कारखान्याचे मागील वर्षीचे फरक बिल जमा झाल्याने राजश्री शाहू पतसंस्था,केज येथे आले दुपारी २ वाजता ते पैसे उचलून केज -धारूर -तेलगाव -मार्गाने गावाकडे मोटार सायकल ने जात असतानाच त्यांच्यावर कोणीतरी पाळत ठेवून केज शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर पाठीमागून मोटार सायकल वरुन ट्रिपल सीट येऊन रस्त्यावर ए भैय्या थांब म्हणून अडवले व बाजूच्या शेतात दोनशे मीटर अंतरावर नेले व त्यांच्या जवळील रोख रक्कम ५९०० /- व सॅमसंग कंपनी चा ४००० /-किंमतीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतले , त्यांना गालावर चापटा मारून गप बस नाहीतर आणखीन तुला मारू अशी धमकी देऊन पसार झाल . पो.हे.कॉ श्री. बिक्कड हे तपास करत आहेत. गेल्या दोन-तीन महिन्यांपासून बीड जिल्हा गुन्हेगारी प्रकरणात चर्चेत आला असून जिल्ह्यातील गुन्हेगारी वातावरण काही केल्या कमी होत नाही.